# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
**Email ID : education.nmc@gmail.com**

सिव्हील कार्यालय,नागपूर
जा.क्र. शि.वि./11076/2014
दि. 20/10/2014

प्रति,

सर्व मुख्याध्यापक,
.............................. प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा. नागपूर

**विषय :– अस्वच्छ व्यवसाय कामगारांच्या मुलांसाठी ऑनलाईन शिष्यवृत्ती योजना (वर्ग 1 ते 10)**

**संदर्भ :– समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचे दि. 17.10.2014 चा प्राप्त ई–मेल .**

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस सुचित करण्यात येते की यापूर्वी आपणांस कार्यालयीन परिपत्रकाद्वारे दि. 30.08.2014 पर्यंत अस्वच्छ व्यवसाय कामगारांच्या मुलांचे शिष्यवृत्ती चे अर्ज भरण्याबाबत सुचना देण्यात आलेली होती. परंतु दि. 17.10.2014 च्या समाजकल्याण विभागाद्वारे प्राप्त ई–मेल द्वारा प्राप्त माहितीनुसार सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन दि. 15.11.2014 पर्यंत भरून सर्व कागदपत्रासह त्याची एकप्रत समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांच्या कार्यालयात सादर करावी.

**टिप :– संकेतस्थळ (wwww.mahaeschol.maharashra.gov.in) या वेबसाईट वर भरण्याबाबत मुख्याध्यापकांनी काळजी घ्यावी.**

**शिक्षणाधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलीपी :–**
1) सहा. शिक्षणाधिकारी, मनपा नागपूर
2) शाळा निरीक्षक, झोन क्र. 1 ते 10, मनपा नागपूर

–सही–
**शिक्षणाधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

F:\Gosavi Sir\Letter

कार्यालय :- जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नागपुर यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या Online शिष्यवृत्ती योजनांची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध.

# (https://mahaeschol.maharashtra.gov.in)

- **<u>सावित्रीबाई फुले ऑनलाईन शिष्यवृत्ती योजना (वर्ग ५ ते ७ व ८ ते १०)</u>**

  **(अनु. जाती /विमाप्र /विजाभज)**

  - विद्यार्थीनीची बँक पासबुकची झेरॉक्स.
  - ऑनलाईन भरलेल्या फार्मची हार्डकॉपी PDF मध्ये मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरीसह.

- **भारत सरकार मॅट्रिकपुर्व ऑनलाईन शिष्यवृत्ती योजना. (वर्ग ९ ते १० अनुसूचित जाती)**

  - विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र
  - वडीलांचे २,००,०००/- लक्ष पर्यंतचे हस्तलीखीत हमीपत्र.
  - विद्यार्थ्यांच्या बँक पासबुकची झेरॉक्स प्रत.
  - Online भरलेल्या फार्मची हार्डकॉपी PDF मध्ये मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरीसह.

- **अस्वच्छ व्यवसाय कामगारांच्या मुलांसाठी ऑनलाईन शिष्यवृत्ती योजना (वर्ग १ ते १०)**

  - विद्यार्थ्यांचे वडील/आई/पालक हे मैला सफाई करणे/जनावराची कातडी सोलने/कातडी कमावणे/कचरा गोळा करणे/उचलणे इत्यादी व्यवसाय करतात याबाबतचे योग्य त्या अधिकाऱ्याचे किंवा आयुक्त/ उपायुक्त,प्रभाग अधिकारी महानगर पालिका विभागासाठी, नगर परिषद व ग्रामिण विभागाकरीता नगर परिषद मुख्याधिकारी ग्रामपंचायत -ग्रामसेवक व सरपंच यांचे प्रमाणपत्र.
  - विद्यार्थी गत वर्षी ज्या वर्गातुन पास झाला त्या बाबतची गुणपत्रीका.
  - या शिष्यवृत्ती व्यतीरिक्त विद्यार्थी इतर दुसरी कोणतीही शिष्यवृत्ती धारण करत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.
  - या विद्यार्थ्यासह दोन आपत्यांचे वर शिफारस न केल्याबाबत मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र.
  - वडिलांचे/आईचे/पालकाचे शपथपत्र - परिशिष्ट 'अ' प्रमाणे (२० रु च्या स्टँपपेपरवर)

- महानगर पालिका व नगर परिषदांतील सभासदांचे जाती,उत्पन्नाचे,अस्वच्छ व्यवसायाचे प्रमाणपत्र विचारात घेतले जाणार नाही.
- रेशन कार्डची दोन्ही बाजुची झेरॉक्स प्रत.
- विद्यार्थ्यांच्या बँक पासबुकची झेरॉक्स प्रत.
- Online भरलेल्या फार्मची हार्डकॉपी PDF मध्ये मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरीसह.

## आवश्यक सुचना :-

### ⇨ शाळेतून नाव काढलेले किंवा पास होऊन गेलेले विद्यार्थी )

जे विद्यार्थी शाळा सोडुन गेले आहेत अशा विद्यार्थ्यांना Online नुतनीकरण करतांनी शाळेच्या ID वरून नापास दाखवायचे आहे जेनेकरून ते विद्यार्थी ज्या शाळेत गेले असतील तेथे त्यांना नविन अर्ज भरतांना त्रास होणार नाही.

### ⇨ दुसऱ्या शाळेतून नाव काढून किंवा पास होऊन आलेले विद्यार्थी

जे विद्यार्थी आपल्या विद्यालयात नव्याने दाखल झाले आहे किंवा दुसऱ्या शाळेतून नाव काढून आलेले आहे अशा विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याअगोदर ते ज्या शाळेतून आपल्या विद्यालयात दाखल झालेले आहे त्या विद्यालयाच्या ID वरून त्या विद्यार्थ्यांना नापास(Fail)दाखवून आपण त्यांचा अर्ज आपल्या ID वर भरू शकतो त्यासाठी संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकांसोबत संपर्क साधावा.

